माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ :- ५३१८ / २०२३ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| मारुती नारायण जाधव | सहाय्यक अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद पुणे | उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद पुणे |

**( सुनावणी दिनांक - १८/०६ /२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि.२४.०८.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी दि.१०.०४.२०२३ च्या माहिती अर्जात, "मा.कार्यकारी अभियंता खताळ यांच्या सहीने तेजस ॲग्रोला दिलेले काम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र व इतर सर्व कागदपत्रांची माहिती."

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, "माहिती दिली नाही."

आज रोजी सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, "अपिलार्थीला माहिती देण्यासाठी सोबत माहिती आणली आहे."

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान अवगत केले की,"अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेतली नाही."

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती (एकूण २९ पृष्ठे )जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमक्ष अपिलार्थी यांना विनामुल्य दिली. सबब,आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुतचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ सत्यमेव जयते

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ५३१८ / २०२३ / पुणे 9133 / 2025

दिनांक - 2/9/2025